# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

**म.न.पा. नागपूर अंतर्गत**
**कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी**
**आरोग्य विभाग सिव्हिल लाईन्स,महानगरपालिका नागपूर.**

**कंत्राटी पदभरती २०१९-२०**

## WALK IN INTERVIEW

आरोग्य विभाग महानगरपालिका नागपूर यांचे नियंत्रणाखालील कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी म.न.पा. नागपूर करिता राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम.) अंतर्गत ठराविक एकत्रित मानधनावर ०५ जानेवारी २०२० पर्यंत करार पध्दतीवर पुर्णतः कंत्राटी स्वरुपात पदे भरण्याकरिता या जाहिरातीमध्ये खालीलप्रमाणे नमुद संवर्गातील रिक्त पदानुसार दिलेल्या पदभरती शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक इच्छूक उमेद्वारांनी Walk In Interview करिता उपस्थित राहावे. या पदांना शासन अनुदान उपलब्धतेपर्यंत कंत्राटी स्वरुपात कार्यरत राहतील.

**(मुलाखतीचे स्थळ : छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकिय इमारतीचे सभागृह, सिव्हिल लाईन्स,महानगरपालिका नागपूर- ०१)**
**(नोंदणीची वेळ : सकाळी ०९.०० ते ११.०० वाजेपर्यंत राहील. विहीत वेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.)**

**(म.न.पा. चे संकेतस्थळ : www.nmcnagpur.gov.in)**

**भरावयाचा रिक्त पदांचा तपशिल.**

| अ. क्र | पदाचे नाव | पद संख्या | एकत्रित मासिक मानधन (रुपये) | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | प्रवर्गानुसार आरक्षण | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | **वैद्यकिय अधिकारी अर्धवेळ** | १७ | २४,०००/- | एम.बी.बी.एस./एम.डी.(स्त्री रोग तज्ञ/डी.जी.ओ) /एम.डी.(मेडिसीन)/एम.डी.(बालरोग तज्ञ/डी.सी.एच.)/एम.डी.शल्य चिकित्सक **(**MBBS or MD (Gynae/DGO) or MD(Medicine) or MD (Pediatrician/DCH) or MD Surgeon**)** **तांत्रिक अर्हता –** महाराष्ट्र मेडिकल कौन्सील चे नोंदणी असणे आवश्यक | वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (सेवा निवृत्त शासकिय अधिकारी असल्यास वयोमर्यादा कमाल ७० वर्षापर्यंत राहील.) | खुला | **दि. २५/०६/२०१९** |

# अटी व शर्ती

१) अनुभवाच्याबाबतीत फक्त शासकिय,निम शासकिय,स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल.
२) उमेद्वार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
३) उमेद्वारांनी जाहिरातीत नमुद पदासाठी स्वतंत्रपणे पदनिहाय मुलाखतीकरिता सकाळी ९.०० वाजता सर्व आवश्यक दस्तावेजांसह उपस्थित राहावे.
४) सदरील पदे हि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत निव्वळ कंत्राटी स्वरुपाची राहतील. त्यांचा नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसलाही संबंध राहणार नाही. पदांसाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.
५) वरील सर्व पदे ही कंत्राटी पध्दतीने भरण्यात येत असल्याने त्यास नागरी सेवा नियम लागू होणार नाही.
६) सदरील पदांकरीता नियमीत/स्थाई करण्याकरीता दावा करता येणार नाही.
७) एकूण पदांच्या संख्येत अथवा आरक्षणामध्ये बदल होवू शकतो.
८) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना सेवानिवृत्ती पुर्वी मिळत असलेले वेतन वजा निवृत्ती वेतन यापेक्षा जी कमी रक्कम येईल ती मानधन म्हणून अदा करण्यात येईल.
९) सदरील पदे ही निव्वळ कंत्राटी पध्द्तीने केवळ प्रकल्प कालावधी पूरते भरावयाचे असून प्रकल्प बंद होताच सदर पदे आपोआप संपुष्टात येतील.
१०)मुलाखत करीता उपस्थित राहणाऱ्या उमेद्वारांना कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
११)मुलाखतीस पात्र उमेद्वाराने मुलाखतीकरीता खालील आवश्यक कागदपत्रे सत्यप्रत(Original) व साक्षांकीत (xerox) प्रतींचा एक संच या सह उपस्थित राहावे.

- नुकताच काढलेला पासपोर्ट साईझ फोटो -१ व स्वतःचा ई-मेल व दुरध्वनी क्रमांक
- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र.
- जन्म तारखेचे प्रमाणपत्र (शाळा/ महाविद्यालय सोडण्याचे प्रमाणपत्र / जन्माचे प्रमाणपत्र)
- ओळखपत्र - आधार कार्ड/ मतदान कार्ड / ड्रायव्हींग लायसंस
- पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेची अंतिम वर्षाची गुणपत्रीका व पदानुसार शासनातर्फे प्राप्त रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.
- पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेशिवाय प्राप्त पदव्युत्तर पदवी (PG Degree) आणि पदव्युत्तर पदवीका (PG Diploma) प्रमाणपत्र.
- वैद्यकीय अधिकाऱ्याकरीता लागु असल्यास सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र.

१२) उच्च शैक्षणीक अर्हता धारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल.
१३) कोणत्याही वेळेस भरती अथवा निवड प्रक्रिया रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समिती एन.यु.एच.एम. म.न.पा. नागपूर यांना राहतील त्यावर कोणतीही हरकत/आक्षेप घेता येणार नाही.
१४) आवेदन पत्र स्विकृत / अस्विकृत करण्याचे अधिकार, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करण्याचे तसेच त्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याबाबतचे संपुर्ण अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा आयुक्त म.न.पा. नागपूर यांचेकडे राखुन ठेवलेले आहे.
१५) उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
१६) मुलाखतीचा दिनांक, स्थळ व वेळ उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद आहे त्याप्रमाणे मुलाखतीकरिता उमेद्वाराने सर्व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे.
१७) अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.
१८) निवड झालेल्या उमेदवाराने रुजू होतांना विहीत नमुन्यात रुपये १००/- च्या बॉन्डपेपरवर करारनामा करुन दयावा लागेल. (सेवेदरम्यान करारनाम्याच्या अटी काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील)

**-स्वा-**
**आयुक्त तथा अध्यक्ष**
**निवड समिती (एन.यु.एच.एम.) महानगर पालिका, नागपूर.**